RNI No. MAHBIL /2009/31747

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-ल

वर्ष १२, अंक ३२] मंगळवार, जून १६, २०२६/ज्येष्ठ २६, शके १९४८ [पृष्ठे ४१, किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक ६०

प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०००३२, दिनांक १६ जून २०२६.

अधिसूचना

सामाजिक सुरक्षा संहिता, २०२०.

क्रमांक संकीर्ण-१०२६/प्र.क्र.०३/कामगार-७अ.—महाराष्ट्र शासन, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० (२०२० चा ३६) च्या कलम १५४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ञ), (ट) व (ठ) आणि कलम १५६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (घ), (ङ), (च), (छ), (झ) व (ञ) या अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि कर्मचारी भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८) अन्वये केलेल्या महाराष्ट्र कामगार भरपाई नियम, १९२४ याचे अधिक्रमण करून, करण्याचे प्रस्तावित केलेले नियमांचे पुढील प्रारुप, त्याद्वारे बाधित होण्याचा संभव असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी, कलम १५४ च्या पोट-कलम (१) व कलम १५६ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे प्रसिद्ध करीत आहे ; आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** ही अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून तीस दिवस समाप्त झाल्यानंतर, महाराष्ट्र शासनाकडून उक्त प्रारुप, विचारात घेण्यात येईल.

२. कोणताही आक्षेप किंवा सूचना, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, सी २०, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ येथे किंवा *mh.labourcodes.rules@gmail.com* या ई-मेलवर स्वीकारता येतील. व्यक्तीचे किंवा संस्थेचे नाव व पत्ता विनिर्दिष्ट करणारा स्तंभ (एक), सुधारणा करावयाचे प्रस्तावित असलेला नियम किंवा पोट-नियम विनिर्दिष्ट करणारा स्तंभ (दोन) आणि बदली दाखल करावयाचे प्रस्तावित असलेला सुधारित नियम किंवा पोट-नियम व त्याची कारणे विनिर्दिष्ट करणारा स्तंभ (तीन) अंतर्भूत असलेल्या एका नमुन्यात आक्षेप व सूचना पाठवाव्यात याव्यात. उपरोक्त नमूद केलेला कालावधी संपण्यापूर्वी, उक्त प्रारूपाच्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून प्राप्त झालेले आक्षेप व सूचना राज्य शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

प्रकरण : एक

प्रस्तावना

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.— (१) ह्या नियमांस, महाराष्ट्र कर्मचारी भरपाई नियम, २०२६ असे म्हणावे.

(२) हे नियम, **ते शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

२. व्याख्या.— (१) या नियमांत, विषय किंवा संदर्भ यानुसार अन्यथा दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) " कर्मचारी भरपाईसाठी प्राधिकृत केलेला अधिकारी " याचा अर्थ, राज्य शासन, ज्याला, सर्वसाधारणपणे किंवा कोणत्याही क्षेत्राच्या किंवा क्षेत्रांच्या वर्गाच्या बाबतीत, या नियमांद्वारे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडे सोपविलेली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी पदनिर्देशित करील असा कोणताही अधिकारी, असा आहे ;

(ख) " संहिता " याचा अर्थ, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० (२०२० चा ३६), असा आहे ;

(ग) " नमुना " याचा अर्थ, या नियमास जोडलेले नमुने, असा आहे ;

(घ) " हस्तांतरण प्राधिकारी " याचा अर्थ, कोणत्याही देशातील असे कोणतेही प्राधिकरण की, जे त्या देशातील कर्मचारी भरपाईशी संबंधित असलेल्या कायद्यानुसार निवाडा दिलेली आणि भारतात राहत असलेल्या किंवा राहणार असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या लाभासाठी लागू असलेली कोणतीही एकरकमी रक्कम हस्तांतरित करते किंवा हस्तांतरित करण्याची व्यवस्था करते.

(२) या नियमांमध्ये वापरलेले, मात्र, त्यात व्याख्या न केलेले, परंतु संहितेमध्ये व्याख्या दिलेले शब्द व संज्ञा यांना, संहितेमध्ये अनुक्रमे, जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच त्यांचे अर्थ असतील.

प्रकरण : दोन

कर्मचारी भरपाई

३. प्राणघातक अपघातांचा अहवाल.— नियोक्ता किंवा कलम ७३(१) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याला प्राणघातक अपघातांचा व गंभीर शारीरिक इजांचा अहवाल देण्यासाठी नियोक्त्याने नियुक्त केलेली व्यक्ती, नमुना एकमध्ये अहवाल पाठवील.

४. जमा करावयाची रक्कम.— जर कर्मचाऱ्याच्या इजेमुळे त्याचा मृत्यू झाला असेल तर, नियोक्ता, संहितेच्या कलम ७६ च्या पोट-कलम (७) अन्वये मिळणाऱ्या भरपाईव्यतिरिक्त, अशा कर्मचाऱ्याच्या अंत्यसंस्काराच्या खर्चापोटी त्याच्या हयात असलेल्या वयाने मोठे असलेल्या अवलंबित व्यक्तीला किंवा, जेव्हा कर्मचाऱ्याची कोणीही अवलंबित व्यक्ती नसेल किंवा त्याच्या मृत्यूच्या वेळी तो त्याच्या अवलंबित व्यक्तीसोबत राहत नसेल, तर, ज्या व्यक्तीने प्रत्यक्षात असा खर्च केला असेल त्या व्यक्तीला प्रदान करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे किमान वीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल इतकी रक्कम जमा करील.

५. कलम ७९ च्या पोट-कलम (१) खालील पुनर्विलोकन अर्ज.— नियोक्ता किंवा कर्मचारी, कलम ७९ च्या पोट-कलम (१) अन्वये अर्धमासिक प्रदानाचे पुनर्विलोकन करण्यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय सक्षम प्राधिकाऱ्याकडे सबळ कारणांसह अर्ज करू शकेल.

(क) नियोक्त्याद्वारे, या कारणास्तव की, भरपाईचा हक्क निर्धारित केल्यापासून कामगारांची मजुरी वाढलेली आहे;

(ख) कामगाराद्वारे, या कारणास्तव की, भरपाईचा हक्क निर्धारित केल्यापासून त्याची मजुरी कमी झालेली आहे;

(ग) कामगाराद्वारे, या कारणास्तव की, नियोक्त्याने भरपाई प्रदान करण्यास सुरुवात केल्यानंतर, ज्यामुळे भरपाई बंद करणे आवश्यक ठरेल असा कामगारांच्या परिस्थितीत कोणताही बदल झालेला नसताना, ती देण्याचे बंद केले आहे;

(घ) एकतर, नियोक्त्याद्वारे किंवा कामगाराद्वारे, या कारणास्तव की, त्या त्या वेळी लागू असलेल्या भरपाईच्या दराचे निर्धारण, फसवणूक किंवा गैरवाजवी प्रभाव किंवा इतर अनुचित मार्गांनी करण्यात आले होते;

(ङ) एकतर, नियोक्त्याद्वारे किंवा कामगाराद्वारे, या कारणास्तव की, भरपाईचे निर्धारण करताना, अभिलेखावर स्पष्ट दिसणारी चूक किंवा त्रुटी झाली आहे.

६. कलम ८२ च्या पोट-कलम (४) अन्वये सूचना पुस्तक ठेवणाऱ्या नियोक्त्यांचा वर्ग.—

(१) ज्या कारखान्यांमध्ये, खाणींमध्ये व आस्थापनांमध्ये धोकादायक कामे केली जातात, त्या सर्व आस्थापनांचे नियोक्त्ये किंवा राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या नियोक्त्ये, नमुना-दोनमध्ये सूचना पुस्तक ठेवतील.

(२) सूचना पुस्तक, आस्थापनेमध्ये ठळक ठिकाणी ठेवण्यात येईल आणि ते इजा झालेल्या कोणत्याही कर्मचाऱ्याला किंवा त्यांच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला सर्व वाजवी वेळी सहज उपलब्ध असेल.

७. कलम ८४ च्या पोट-कलम (१) खालील वैद्यकीय तपासणीची वारंवारता.— ज्या कर्मचाऱ्याला पंधरवड्याचे वेतन मिळते त्या कर्मचाऱ्याने, अपघातानंतरच्या पहिल्या महिन्यात दोनपेक्षा अधिक वेळा किंवा त्यानंतरच्या कोणत्याही महिन्यात एकदापेक्षा अधिक वेळा, तो त्या त्यावेळी जेथे राहत असेल त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतरत्र वैद्यकीय तपासणीसाठी हजर राहण्याची आवश्यकता असणार नाही.

८. कलम ८८ च्या पोट-कलम (१) अन्वये नियोक्त्याने सादर करावयाचे निवेदन.—

(१) जेव्हा सक्षम प्राधिकारी, प्राणघातक अपघाताची माहिती मिळते, तेव्हा, ते कर्मचाऱ्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीचे निवेदन सादर करण्यासाठी कर्मचाऱ्याच्या नियोक्त्याला नमुना-तीनमध्ये नोटीस जारी करू शकेल.

(२) नियोक्ता, कलम ८८ च्या पोट-कलम (१) नुसार नमुना-चारमध्ये निवेदन सादर करील.

(३) कलम ८८ च्या पोट-कलम (१) खालील अपघाताच्या बाबतीतील अहवाल, ज्या प्राधिकाऱ्यास अशा अपघाताची नोटीस देणे आवश्यक आहे, त्या प्राधिकाऱ्याला पाठवता येईल, त्यामध्ये, अपघाताची तारीख, वेळ, कर्मचाऱ्याला दिलेली वैद्यकीय मदत यांचा समावेश असेल.

९. कलम ८९ च्या पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने सामंजस्य कराराची नोंद वहीत नोंद करण्याची रीत.—

(१) कलम ८९ च्या पोट-कलम (१) अन्वये सक्षम अधिकाऱ्याकडे पाठवलेला सामंजस्य करार, सक्षम प्राधिकाऱ्याने अन्यथा निर्देश दिलेला नसेल तर, दुबार प्रतीमध्ये असेल आणि प्रकरणाच्या परिस्थितीनुसार शक्य त्याप्रमाणे, यथास्थिति, नमुना-पाच किंवा नमुना-सहा किंवा नमुना-सातशी निकट सुसंगत असेल.

(२) जेव्हा सक्षम प्राधिकाऱ्याकडे, त्याने सामंजस्य करार नोंदविण्यास नकार द्यावा असे वाटत नसेल तेव्हाची कार्यपद्धती :-

(क) सामंजस्य करार प्राप्त झाल्यावर, सक्षम प्राधिकारी, सामंजस्य करार नोंदवण्यास नकार देण्यास कारणे आहेत असे त्याला वाटत नसेल तर, तो नोंदवण्यासाठी एक तारीख निश्चित करील, आणि संबंधित पक्षकारांना नमुना-आठमध्ये लेखी स्वरूपात अशी नोटीस देईल की, आक्षेप न आल्यास, तो, अशा प्रकारे निश्चित केलेल्या तारखेला सामंजस्य करार नोंदवण्याचा प्रस्ताव करील :

परंतु, तेव्हा लेखी नोटीस काढली जाणार होती, त्या वेळी जे उपस्थित होते त्या पक्षकारांना ही नोटीस तोंडी कळविता येऊ शकेल.

(ख) अशा प्रकारे निश्चित केलेल्या तारखेला, सक्षम प्राधिकारी, जर उपस्थित असलेल्या व आपले म्हणणे मांडू इच्छिणाऱ्या कोणत्याही पक्षकारांचे म्हणणे ऐकल्यानंतर, त्याची नोंद करू नये असे त्याला वाटले नाही तर, निवेदनाची नोंद करील :

परंतु, खंड (क) अन्वये नोटीस बजावल्यामुळे, संबंधित कोणत्याही पक्षकाराने कोणताही आक्षेप घेतला नसला तरी, सक्षम अधिकाऱ्यास, अशा प्रकारे निश्चित केलेल्या तारखेला निवेदनाची नोंद करण्यास नकार देण्यापासून प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही.

(ग) जर अशा तारखेला, सक्षम प्राधिकाऱ्याने, निवेदनाची नोंद करू नये असा निर्णय घेतला असेल तर, तो, उपस्थित असलेल्या पक्षकारांना त्याच्या निर्णयाची आणि त्यामागील कारणांची माहिती देईल, आणि जर निवेदनाची नोंद करावी अशी इच्छा असलेला कोणताही पक्षकार हजर नसेल तर, तो त्या पक्षकाराला नमुना- नऊमध्ये माहिती पाठवील.

(३) जेव्हा सक्षम प्राधिकाऱ्याला, त्याने सामंजस्य करार नोंदविण्यास नकार द्यावा असे वाटत असेल तेव्हाची कार्यपद्धती :-

(क) सामंजस्य करार प्राप्त झाल्यावर, सक्षम प्राधिकाऱ्याला, तो नोंदवण्यास नकार देण्यास कारणे आहेत असे वाटत असेल तर, तो, सामंजस्य करार नोंदवण्याची इच्छा असलेल्या पक्षकाराची किंवा पक्षकारांची सुनावणी घेण्यासाठी एक तारीख निश्चित करील, आणि अशा पक्षकारास किंवा पक्षकारांना व जर त्याला योग्य वाटले तर, इतर कोणत्याही संबंधित पक्षकाराला, अशा प्रकारे निश्चित केलेल्या तारखेची आणि ज्या कारणांवरून सामंजस्य करार नोंदवला जाऊ नये असे त्याला वाटते, त्या कारणांची माहिती देईल.

(ख) जर माहिती दिलेले पक्षकार उपस्थित नसतील तर, त्यांना, नमुना दहामध्ये किंवा यथास्थिति, नमुना अकरामध्ये एक लेखी नोटीस पाठविण्यात येईल, आणि अशा नोटीसीमध्ये निश्चित केलेली तारीख, ती जारी केल्याच्या तारखेनंतर सात दिवसांपेक्षा कमी नसेल.

(ग) जर, खंड (क) अन्वये निश्चित केलेल्या तारखेला, सामंजस्य करार नोंदवण्याची इच्छा असणाऱ्या पक्षकाराने किंवा पक्षकारांनी, त्याची नोंद करण्यासाठी कार्यवाही करण्याकरिता पुरेसे कारण दाखवले असेल तर, सक्षम प्राधिकारी, जर सर्व संबंधित पक्षकारांना आधीच माहिती देण्यात आलेली असेल तर, कराराची नोंद करू शकेल. जर, अशा सर्व पक्षकारांना माहिती देण्यात आलेली नसेल तर, तो पोट-नियम (१) नुसार कार्यवाही करील.

(घ) जर, अशा प्रकारे निश्चित केलेल्या तारखेला, सक्षम प्राधिकारी, सामंजस्य करार नोंदवण्यास नकार देईल तर, तो, खंड (क) अन्वये माहिती न मिळालेल्या कोणत्याही पक्षकाराला नमुना-नऊमध्ये नोटीस पाठवील.

(४) सामंजस्य करार नोंदवण्यास नकार दिल्यावर करावयाची कार्यपद्धती :—

(क) जर, कोणत्याही प्रकरणी, सक्षम प्राधिकारी, सामंजस्य करार नोंदवण्यास नकार देईल तर, तो, अशा नकाराची कारणे थोडक्यात नोंदवील.

(ख) जर, सक्षम प्राधिकारी, सामंजस्य कराराची नोंद करण्यास नकार देईल तर, तो, अशी रक्कम देण्यास पात्र असलेल्या पक्षकाराला, ती का दिली जाऊ नये याचे कारण दाखवण्याची संधी दिली दिल्याशिवाय, करारामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेपेक्षा अधिक असलेल्या कोणत्याही रकमेचे किंवा रकमांचे प्रदान करण्याचा निर्देश देणारा कोणताही आदेश पारित करणार नाही.

(ग) जेव्हा करार हा, एकरकमी रक्कम देऊन अर्ध-मासिक प्रदानांची परतफेड करण्यासाठीचा असेल, आणि करारामध्ये निश्चित केलेल्या रकमेच्या अपुरेपणामुळे सामंजस्य कराराची नोंद केली जाऊ नये असे सक्षम प्राधिकाऱ्याकडे असे वाटत असेल तर, तो, कामगाराच्या अपंगत्वाच्या संभाव्य कालावधीचा त्याचा अंदाज नोंदवील.

(५) अभिलेखासाठी स्वीकारलेल्या सामंजस्य कराराची नोंदणीः- सामंजस्य कराराची नोंद करताना, सक्षम प्राधिकारी, त्याची नोंद नमुना-बारामधील नोंदवहीमध्ये करण्याची व्यवस्था करेल आणि त्याच्याकडे ठेवून घेतलेल्या सामंजस्य कराराच्या प्रतीवर आपल्या सहीसह पुढील शब्दांमध्ये पृष्ठांकन करण्याची व्यवस्था करील :—

" नोंदवहीमध्ये २० ..... चा अनुक्रमांक ..... असलेला हा सामंजस्य करार, आज दिनांक ....., ... २०..... रोजी नोंदवण्यात आला आहे." सक्षम प्राधिकाऱ्याची सही.

१०. अभिलेख किंवा रकमेचे हस्तांतरण.— (१) जर संहितेअन्वये कोणत्याही प्रकरणावर, ज्या क्षेत्रात अपघात झाला असेल त्या क्षेत्रावर अधिकारिता असलेल्या सक्षम प्राधिकाऱ्या व्यतिरिक्त इतर सक्षम प्राधिकाऱ्यासमोर किंवा प्राधिकाऱ्याद्वारे कार्यवाही करणे आवश्यक असेल तर, पहिला प्राधिकारी, त्या प्रकरणाचा योग्य निपटारा करण्यासाठी, नमुना-तेरामध्ये, दुसऱ्या प्राधिकाऱ्याकडे शिल्लक असलेल्या कोणत्याही अभिलेखाच्या किंवा रकमेच्या हस्तांतरणासह एक सविस्तर अहवाल नमुना-तेरा मध्ये मागवू शकेल आणि अशी विनंती प्राप्त झाल्यावर, अभिलेख असलेला सक्षम प्राधिकारी त्याचे पालन करील :

परंतु, जर ज्या क्षेत्रात अपघात झाला आहे त्या क्षेत्रात वादमुद्दे निश्चित करण्यासाठी किंवा भरपाईची रक्कम निर्धारित करण्यासाठी कोणतीही आणखी चौकशी करणे आवश्यक असेल तर, ज्या सक्षम प्राधिकाऱ्यासमोर अर्ज दाखल केला आहे तो प्राधिकारी, ज्या क्षेत्रात अपघात झाला आहे त्या क्षेत्रातील सक्षम प्राधिकाऱ्याला अशी चौकशी करण्यास आणि अशा चौकशीच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेल्या नोटीसा किंवा आदेश बजावण्यास सांगेल.

(२) कलम ८१ अन्वये एका सक्षम प्राधिकाऱ्याकडे जमा केलेली रक्कम, दुसऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे एकतर, रेमिटन्स ट्रान्सफर पावतीद्वारे किंवा ई-ट्रान्सफरद्वारे किंवा नेट बँकिंगद्वारे किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे हस्तांतरित करण्यात येईल.

११. कलम ९३(४) नुसार अर्ज निकालात काढण्यासाठीची कालमर्यादा आणि कार्यवाहीचा अनुषंगिक खर्च.—

(१) कलम ९३ अन्वये दाव्याच्या तडजोड करण्यासाठी केलेला अर्ज, शक्यतोवर, तो प्राप्त झाल्यापासून ६ महिन्यांच्या आत निकालात काढण्यात येईल.

(२) आनुषंगिक खर्च :— (एक) विवादातील कोणताही पक्षकार, ज्याला निर्णयाच्या, हुकूमनाम्याच्या किंवा इतर दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रती हव्या असतील, तो पक्षकार पुढील दराने खर्च प्रदान केल्यावर त्या मिळवू शकेल :—

(क) अभिलेखाच्या किंवा निवेदनाच्या किंवा आदेशाच्या किंवा हुकूमनाम्याच्या कोणत्याही दस्तऐवजाच्या प्रतीचा खर्च, उक्त दस्तऐवजाच्या प्रत्येक पृष्ठासाठी दोन रुपये इतका असेल.

(ख) समन्स किंवा नोटीस बजावण्याचा खर्च किंवा साक्षीदारांचा खर्च किंवा वर निर्दिष्ट न केलेल्या कोणत्याही बाबींच्या बाबतीत प्रदेय असलेला खर्च, सक्षम प्राधिकाऱ्याने प्रत्येक प्रकरणात आदेश दिल्याप्रमाणे असेल.

(ग) सक्षम प्राधिकाऱ्यास, एकतर अर्जदाराच्या अर्जावरून किंवा अन्य प्रकारे, अर्जदार खर्च देण्यास असमर्थ असल्याचे आढळून येईल तेव्हा, तो, त्याला खर्च प्रदान करण्यापासून सूट देऊ शकेल.

(दोन) विवादातील पक्षकार नसलेली कोणतीही व्यक्ती, गोपनीय दस्तऐवज वगळता, निर्णय, हुकूमनामा किंवा इतर दस्तऐवजांची प्रमाणित प्रत, मागील खंडात विनिर्दिष्ट केलेले शुल्क प्रदान केल्यावर मिळवू शकेल.

१२. कलम ९७ अन्वये सामंजस्य कराराचे अधिप्रमाणन करण्याची रीत (अर्जदाराची तपासणी).—

(१) कलम ९३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अर्ज प्राप्त झाल्यावर, सक्षम प्राधिकारी, अर्जदाराची शपथेवर तपासणी करू शकेल किंवा तो, या बाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे अर्जदारास पाठवू शकेल आणि अशा अधिकाऱ्याला अर्जदाराची व त्याच्या साक्षीदाराची तपासणी करण्याचे आणि त्याचा अभिलेख, सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठवण्याचे निर्देश देऊ शकेल.

(२) नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाचा पुरावा, शक्य असेल तितपत शब्दशः लिहून घेण्यात येईल ; तो व्हिडिओ कॉन्फरन्सवर ध्वनिमुद्रित केला जाऊ शकेल. खंड (एऊ) अन्वये केलेल्या कोणत्याही तपासणीचा सारांश, कलम ९७ मध्ये पुरावा नोंदवण्यासाठी तरतूद केलेल्या रीतीनुसार ध्वनिमुद्रित करण्यात येईल.

नमुना : एक

(नियम ३ पहा)

प्राणघातक अपघातांचा अहवाल

प्रति,

.....

.....

.....

महोदय,

मी याद्वारे, एका अपघाताचा खालील अहवाल सादर करीत असून तो, दिनांक ..... (तारीख) रोजी ..... येथे (येथे परिसराचा तपशील लिहा) घडला आणि त्यामध्ये, कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला / त्याला गंभीर शारीरिक इजा झाली असून त्याचा तपशील, सोबत जोडलेल्या निवेदनात दिलेला आहे.

२. ज्या परिस्थितीत, कर्मचाऱ्याचा/कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला/ त्याला गंभीर शारीरिक इजा झाली, ती परिस्थिती खालीलप्रमाणे होती :-

(अ) अपघाताची वेळ :

(ब) अपघात घडलेले ठिकाण :

(क) अपघाताच्या वेळी मृत व्यक्ती, जा रीतीने काम करीत होती/होत्या ती परिस्थिती :

(ड) अपघाताचे कारण :

(इ) इतर कोणताही संबंधित तपशील :

आपला विश्वासू,

(अहवाल देणाऱ्या व्यक्तीची सही व पदनाम)

विवरणपत्र

नाव	लिंग	वय	कामाचे स्वरूप	टपालाचा पूर्ण पत्ता

नमुना : दोन

[नियम ६ (१) पहा]

नोटीस पुस्तक

अ. क्र.	नोटीसी ची तारीख	नोटीसी ची वेळ	इजा झालेल्या व्यक्तीचे नाव व पत्ता	लिंग	वय	विमा क्रमांक	कर्मचाऱ्यांची पाळी, विभाग व व्यवसाय	इजेचा तपशील					अपघाताच्या वेळी इजा झालेली व्यक्ती नेमके काय करत होती	नोटीस देणाऱ्या व्यक्तीचे नाव (व्यक्तींची नावे), व्यवसाय, पत्ता व सही किंवा अंगठ्याचा ठसा	अपघात पुस्तका-मध्ये नोंद करणाऱ्या व्यक्तीची सही व पदनाम	दोन साक्षीदारांची नावे, पत्ता व व्यवसाय	शेरा, कोणताही असल्यास
								कारण	स्वरूप	तारीख	वेळ	ठिकाण					

नमुना : तीन

[नियम ८ (१) पहा]

नोटीस

ज्याअर्थी, मला अशी माहिती मिळाली आहे की, (.....) तुमच्याकडे (.....) मध्ये कामावर असलेल्या एका कामगाराचा,त्याच्या नोकरीतून उद्‌भवलेल्या किंवा नोकरीच्या ओघात झालेल्या अपघातामुळे मृत्यू झाला आहे, त्याअर्थी, मी याद्वारे, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या कलम ८२ नुसार, तुम्हाला ही नोटीस मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, सोबत जोडलेला, परिच्छेद १, २ व ३ मध्ये आवश्यक असलेला तपशील आणि परिच्छेद ४ किंवा ५ पैकी कोणत्याही एका परिच्छेदामध्ये आवश्यक असलेला तपशील रीतसर भरलेला नमुना, मला सादर करण्यास फर्मावीत आहे. जर तुम्ही, भरपाई देण्याचे दायित्व मान्य केले असेल तर, उक्त संहितेच्या कलम ८८ नुसार आवश्यक असलेली रक्कम, ही नोटीस मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे.

सक्षम प्राधिकारी.

दिनांक ..... २० .....

(१) ..... येथे कर्मचाऱ्यांची नावे लिहा.

(२) ..... येथे आस्थापनेचे नाव लिहा.

नमुना : चार

[नियम ८ (२) पहा]

(नियोक्त्याचे निवेदन)

१. मला, दिनांक मला २०..... रोजी मिळालेल्या तुमच्या दिनांक ..... २०..... च्या नोटीसीच्या उत्तरादाखल, असे सादर करण्यात येते की, ... येथे राहणारा .....[१] १५ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचा कर्मचारी, ...[२] मध्ये कामाला होता, त्याचा दिनांक ..... २०..... रोजी अपघात झाला असून परिणामी, दिनांक .....,२०..... रोजी त्याचा मृत्यू झाला. मृताचे मासिक वेतन रूपये ..... इतके होते.

२. मृताचा मृत्यू ज्या परिस्थितीत झाला, ती परिस्थिती खालीलप्रमाणे होती :—

३. मृताच्या मागे खालील अवलंबित[३] आहेत :—

*४. मृताच्या मृत्यूमुळे भरपाई म्हणून रु. ..... इतकी रक्कम देण्याचे माझे दायित्व मी मान्य करीत असून, ती रक्कम दिनांक .....,२०..... रोजी किंवा त्यापूर्वी तुमच्याकडे जमा करण्यात आली होती/येईल.

*५. पुढील कारणांवरून मृत व्यक्तीच्या मृत्यूप्रकरणी भरपाई प्रदान करण्याचे दायित्व मी नाकारत आहे :—

नियोक्ता.

* यापैकी एक परिच्छेद वगळावा.

---

१. कर्मचाऱ्याचे नाव.

२. आस्थापनेचे नाव.

३. नावे व पत्ता (माहित असल्यास) नमूद करा.

नमुना : पाच

[नियम ९ (१) पहा]

सामंजस्य करार

याद्वारे असे सादर करण्यात येते की, ... येथे राहणारे ..... यांना, दिनांक .....२०..... रोजी त्यांच्या ..... येथील नोकरीतून उद्‌भवलेल्या किंवा नोकरीच्या ओघात झालेल्या अपघातामुळे शारीरिक इजा झाली. उक्त इजेमुळे उक्त कर्मचाऱ्याला तात्पुरते अपंगत्व आले असून त्यामुळे असा अंदाज आहे की, ते ..... महिन्यांच्या कालावधीसाठी त्यांच्या पूर्वीच्या कोणत्याही वेतनापेक्षा अधिक कमाई करू शकणार नाहीत. उक्त कर्मचाऱ्याला दिनांक .....२०..... पासून दिनांक .....२० ..... पर्यंत चालू असलेले एकूण रुपये ..... इतके अर्धमासिक वेतन प्रदान करण्याचे बाकी आहे. उक्त कर्मचाऱ्याचे मासिक वेतन एकूण रु. ..... इतके असल्याचा अंदाज आहे. उक्त कर्मचाऱ्याचे मासिक वेतन अंदाजे रुपये ..... इतके आहे. उक्त कर्मचारी, १५ वर्षांवरील वयाचा आहे/..... रोजी १५ वर्षे वयाचा होईल.

आणखी असेही सादर करण्यात येते की, ... उक्त कर्मचाऱ्याच्या नियोक्त्याने, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अन्वये, उक्त अपघातामुळे उद्‌भवलेल्या, आता किंवा भविष्यात प्रकट होणाऱ्या, तात्पुरत्या स्वरूपाच्या सर्व अपंगत्वाच्या बाबतीतील सर्व व प्रत्येक दाव्याच्या संपूर्ण समझोत्यासाठी रु. ..... इतकी रक्कम प्रदान करण्याचे मान्य केले आहे आणि उक्त कर्मचाऱ्याने ती स्वीकारण्यास सहमती दर्शवली आहे. म्हणून, अशी विनंती आहे की, या सामंजस्य कराराची रीतसर नोंद करण्यात यावी.

दिनांक ..... २० .....

नियोक्त्याची सही .....

साक्षीदार .....

कर्मचाऱ्यांची सही .....

साक्षीदार .....

(**टीप .—** करार नोंदणीसाठीचा अर्ज एका पक्षकाराच्या सहीने सादर केला जाऊ शकतो, परंतु, दुसऱ्या पक्षकाराने अटी मान्य केलेल्या असाव्यात. परंतु, शक्य असेल तेथवर दोन्ही पक्षकारांनी सह्या कराव्यात.)

(जेव्हा रक्कम प्रत्यक्षात प्रदान करण्यात येईल तेव्हा, पावती भरावी)

वरील करारानुसार, मी आज रुपये..... इतकी रक्कम स्वीकारली आहे.

कर्मचारी

शिक्का.

दिनांक ..... २०.....

ही रक्कम प्रदान करण्यात आली आहे आणि या पावतीवर माझ्या उपस्थितीत सही करण्यात आली आहे.

..... साक्षीदार

टीप.— विशेष प्रकरणांनुसार या नमुन्यात बदल केला जाऊ शकतो, उदा., जेव्हा कर्मचारी कायदेशीर अपंगत्वाखाली असेल तेव्हा व्यावसायिक आजारामुळे झालेल्या इजेजाचा करार, इत्यादी.

नमुना : सहा

(नियम ९ (१) पहा)

सामंजस्य करार

याद्वारे असे सादर करण्यात येते की, ... येथे राहणारे ..... यांना, दिनांक .....२०..... रोजी त्यांच्या ..... येथील नोकरीतून उद्‌भवलेल्या किंवा नोकरीच्या ओघात झालेल्या अपघातामुळे शारीरिक इजा झाली. उक्त इजेमुळे उक्त कर्मचाऱ्याला खालील स्वरूपाचे कायमचे अपंगत्व आले आहे :—

उक्त कर्मचाऱ्याचे मासिक वेतन अंदाजे रुपये..... इतके आहे. उक्त कर्मचारी, १५ वर्षांवरील वयाचा आहे/..... रोजी १५ वर्षे वयाचा होईल.

उक्त कर्मचाऱ्याने, या कराराच्या तारखेपूर्वी, पुढील रकमा प्राप्त झालेले आहेत :—

दिनांक .....रोजी, रुपये .....

दिनांक .....रोजी, रुपये .....

दिनांक .....रोजी, रुपये .....

दिनांक .....रोजी, रुपये .....

आणखी असेही सादर करण्यात येते की,..... उक्त कर्मचाऱ्याच्या नियोक्त्याने, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अन्वये, उक्त अपघातामुळे उद्‌भवलेल्या, वर नमूद केलेल्या अपंगत्वाच्या आणि आता प्रकट झालेल्या सर्व अपंगत्वाच्या बाबतीतील सर्व व प्रत्येक दाव्याच्या संपूर्ण समझोत्यासाठी रुपये..... इतकी रक्कम प्रदान करण्याचे मान्य केले आहे आणि उक्त कर्मचाऱ्याने ती स्वीकारण्यास सहमती दर्शवली आहे. म्हणून, अशी विनंती आहे की, या सामंजस्य कराराची रीतसर नोंद करण्यात यावी.

दिनांक .....२०.....

नियोक्त्याची सही .....

साक्षीदार .....

कर्मचाऱ्यांची सही .....

साक्षीदार .....

(**टीप :—** करार नोंदणीसाठीचा अर्ज एका पक्षकाराच्या सहीने सादर केला जाऊ शकतो, परंतु, दुसऱ्या पक्षकाराने अटी मान्य केलेल्या असाव्यात. परंतु, शक्य असेल तेथवर दोन्ही पक्षकारांनी सह्या कराव्यात.)

(जेव्हा रक्कम प्रत्यक्षात प्रदान करण्यात येईल तेव्हा, पावती भरावी)

वरील करारानुसार, मी आज रुपये..... इतकी रक्कम स्वीकारली आहे.

कर्मचारी.

शिक्का.

दिनांक .....२०.....

ही रक्कम प्रदान करण्यात आली आहे आणि या पावतीवर माझ्या उपस्थितीत सही करण्यात आली आहे.

..... साक्षीदार.

टीप.— विशेष प्रकरणांनुसार या नमुन्यात बदल केला जाऊ शकतो, उदा., जेव्हा कर्मचारी कायदेशीर अपंगत्वाखाली असेल तेव्हा व्यावसायिक आजारामुळे झालेल्या इजेजाचा करार, इत्यादी.

नमुना : सात

(नियम ९ (१) पहा)

सामंजस्य करार

याद्वारे असे सादर करण्यात येते की, ... येथे राहणारे ..... यांना, दिनांक .....२०..... रोजी त्यांच्या ..... येथील नोकरीतून उद्‌भवलेल्या किंवा नोकरीच्या ओघात झालेल्या अपघातामुळे शारीरिक इजा झाली. उक्त इजेमुळे उक्त कर्मचाऱ्याला तात्पुरते अपंगत्व आले असून त्याला सध्या दरमहा रुपये ..... इतकी मजुरी मिळत आहे / कोणतीही मजुरी नाही. उक्त कर्मचाऱ्याचे अपघातापूर्वीचे मासिक वेतन अंदाजे रुपये ..... इतके आहे. कर्मचारी ..... या कारणास्तव कायदेशीर अपंगत्वास पात्र आहे.

आणखी असेही सादर करण्यात येते की, ... उक्त कर्मचाऱ्यांच्या नियोक्त्याने,उक्त तात्पुरत्या ..... अपंगत्वाच्या कालावधीसाठी रुपये ..... इतक्या दराने अर्धमासिक वेतन प्रदान करण्याचे मान्य केले आहे आणि उक्त कर्मचाऱ्यांच्या वतीने ..... यांनी ते स्वीकारण्यास सहमती दर्शवली आहे. हा करार या अटीच्या अधीन आहे की, अपंगत्वाच्या कालावधीत उक्त कामगाराच्या उत्पन्नात बदल झाल्यामुळे सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या तरतुदींनुसार अर्धमासिक वेतनाच्या रकमेत बदल केला जाऊ शकतो. आणखी असे नमूद करण्यात येत आहे की, उक्त संहितेच्या कलम ९७ अन्वये संप्रेषणाचे सर्व हक्क या करारामुळे अबाधित राहतील. म्हणून अशी विनंती आहे की, या कराराची रीतसर नोंद करण्यात यावी.

दिनांक .....२०.....

नियोक्त्याची सही .....

साक्षीदार .....

कर्मचाऱ्यांची सही .....

साक्षीदार .....

(**टीप .—** करार नोंदणीसाठीचा अर्ज एका पक्षकाराच्या सहीने सादर केला जाऊ शकतो, परंतु, दुसऱ्या पक्षकाराने अटी मान्य केलेल्या असाव्यात. परंतु, शक्य असेल तेथवर दोन्ही पक्षकारांनी सह्या कराव्यात.)

(जेव्हा रक्कम प्रत्यक्षात प्रदान करण्यात येईल तेव्हा, पावती भरावी)

वरील करारानुसार, मी आज रुपये..... इतकी रक्कम स्वीकारली आहे.

कर्मचारी.

शिक्का.

दिनांक .....२०.....

ही रक्कम प्रदान करण्यात आली आहे आणि या पावतीवर माझ्या उपस्थितीत सही करण्यात आली आहे.

..... साक्षीदार.

टीप.— विशेष प्रकरणांनुसार या नमुन्यात बदल केला जाऊ शकतो, उदा., जेव्हा कर्मचारी कायदेशीर अपंगत्वाखाली असेल तेव्हा व्यावसायिक आजारामुळे झालेल्या इजेजाचा करार, इत्यादी.

नमुना : आठ

(नियम ९ (२) (क) पहा)

ज्याअर्थी, ... आणि ..... यांच्यामध्ये भरपाई प्रदान करण्याचा करार झाला असल्याचे म्हटले जात असल्याने, आणि ज्याअर्थी, ... यांनी सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या कलम ८९ अन्वये कराराच्या नोंदणीसाठी अर्ज केला असल्याने, याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त करार ..... २०..... रोजी विचारात घेण्यात येईल आणि उक्त कराराच्या नोंदणीबाबत कोणताही आक्षेप असल्यास, त्याच तारखेला नोंदवावा. वैध आक्षेप नसल्यास, कराराच्या नोंदणीची कार्यवाही करण्याचा माझा इरादा आहे.

दिनांक .....२०.....

सक्षम प्राधिकारी.

नमुना : नऊ

(नियम ९ (२) (ग), (३) (घ) पहा)

याची नोंद घ्यावी की, ... आणि ..... यांच्यामध्ये .....२०..... रोजी करण्यात आल्याचे म्हटले जात असलेल्या भरपाई प्रदान करण्याच्या कराराची नोंदणी खालील कारणांमुळे नाकारण्यात आली आहे;-

दिनांक .....२०.....

सक्षम प्राधिकारी.

नमुना : दहा

(नियम ९ (३) (ख) पहा)

ज्याअर्थी, ... आणि ..... यांच्यामध्ये भरपाई प्रदान करण्याचा करार झाला असल्याचे म्हटले जात आहे, आणि ज्याअर्थी, ... यांनी, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या कलम ८९ अन्वये कराराची नोंदणी करण्यासाठी अर्ज केला आहे, आणि ज्याअर्थी, मला असे वाटते की, खालील कारणांमुळे सदर कराराची नोंदणी करण्यात येऊ नये :-.....

उक्त कराराची नोंदणी का करण्यात यावी याचे कारण दर्शविण्यासाठी तुम्हाला .....२०..... रोजी संधी देण्यात येईल. त्या तारखेला योग्य कारण न दाखवल्यास, कराराची नोंदणी करण्यास नकार देण्यात येईल..

दिनांक .....२०..... .

सक्षम प्राधिकारी.

नमुना : अकरा

(नियम ९ (३) (ख) पहा)

ज्याअर्थी, ... आणि ..... यांच्यामध्ये भरपाई प्रदान करण्याचा करार झाला असल्याचे म्हटले जात आहे, आणि ज्याअर्थी, ... यांनी, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० याच्या कलम ८९ अन्वये कराराची नोंदणी करण्यासाठी अर्ज केला आहे, आणि ज्याअर्थी, मला असे वाटते की, खालील कारणांमुळे सदर कराराची नोंदणी करण्यात येऊ नये :-.....
.....
.....

उक्त कराराची नोंदणी का करण्यात यावी याचे कारण दर्शविण्यासाठी तुम्हाला .....२०..... रोजी संधी देण्यात येईल. त्या तारखेला योग्य कारण न दाखवल्यास, कराराची नोंदणी करण्यास नकार देण्यात येईल. उक्त कराराच्या बाबतीत तुम्हाला जे काही निवेदन करायचे असेल, ते त्याच दिवशी करावे. जर त्यावेळी पुरेसे कारण दाखवले गेले तर, कराराची नोंदणी केली जाऊ शकेल.

दिनांक .....२०.....

सक्षम प्राधिकारी.

नमुना : बारा

(नियम ९ (५) पहा)

सन २० ..... च्या करारांची नोंदवही

अनुक्रमांक (१)	कराराचा दिनांक (२)	नोंदणीचा दिनांक (३)	नियोक्ता (४)	कर्मचारी (५)	सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी (६)	नोंदवही दुरुस्त करणाऱ्या आदेशांचा संदर्भ (७)

नमुना : तेरा

(नियम १० (१) पहा)

प्रति,

.....

.....

.....

महोदय,

दिनांक ..... (तारीख) रोजी ..... येथे (येथे परिसराचा तपशील लिहा) अपघात घडला असून परिणामी, त्यामध्ये कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला किंवा तो अपंग झाला, त्याचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :—

१. (क) कर्मचाऱ्याचे नाव ----------, लिंग ---------, वय ----------

(ख) मासिक वेतन :

(ग) रोजगाराचे स्वरूप :

(ड) नियोक्त्याचे नाव :

(ङ) कर्मचाऱ्यांचा/अवलंबित व्यक्तींचा टपालाचा संपूर्ण पत्ता (स्थानिक व कायमस्वरूपी दोन्ही).

(इ) जिथे त्याचे नोंदणीकृत कार्यालय आहे तो कारखान्याचा/ आस्थापनेचा टपालाचा संपूर्ण पत्ता :

२. कर्मचाऱ्याच्या मृत्यू होण्यास/अपंगत्वास कारणीभूत ठरलेली परिस्थिती :—

(क) अपघाताची वेळ :

(ख) अपघात घडला ते ठिकाण :

(ग) त्या वेळी मृत व्यक्ती कोणत्या रीतीने कामावर होती/होत्या :

(घ) अपघाताचे कारण :

३. कलम ८१ अन्वये नियोक्त्याने सक्षम प्राधिकाऱ्याकडे जमा केलेली रक्कम :

४. (क) प्रदान केलेली भरपाई, कोणतीही असल्यास, तिचा तपशील :

(ख) मृत कर्मचाऱ्याच्या अवलंबितांच्या लाभासाठी गुंतविलेल्या रकमेचा तपशील.

५. खालीलप्रमाणे पाठवलेले दस्तऐवज (मूळ प्रतींमध्ये) :—

(क) मृत्यू प्रमाणपत्र.

(ख) सक्षम वैद्यकीय प्राधिकरणाकडील अपंगत्वाचे प्रमाणपत्र.

(ग) नियोक्त्याने भरपाई जमा केल्याची पावती.

(घ) वितरणाचे विवरण.

(ङ) कर्मचाऱ्यास/अवलंबितांस भरपाई मिळाल्याची पावती.

(च) सामंजस्य करार, कोणताही असल्यास.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आय. ए. कुंदन,
शासनाचे प्रधान सचिव.

INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 16th June 2026.

NOTIFICATION

CODE ON SOCIAL SECURITY, 2020.

No. Miscellaneous-1026/C.R.03/LABOUR-7a.—The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clauses (j), (k) and (l) of sub-section (*2*) of sections 154 and clauses (d), (e), (f), (g), (i) and (j) of sub-section (*2*) of section 156 of the Code on Social Security, 2020 (36 of 2020) and of all other power enabling it in that behalf and in supersession of the Maharashtra Workmen's Compensation Rules, 1924 made under the Employees' Compensation Act, 1923 (8 of 1923), is hereby published as required by sub-section (*1*) of section 154 and sub-section (*1*) of section 156, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra, after the expiry of thirty days from the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazette*.

2. Any objection or suggestion may be received by the Commissioner of Labour, Maharashtra State, Kamgar Bhawan, C 20, E Block, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai 400 051 or on email-*mh.labourcodes.rules@gmail.com*. The objections and suggestions should be sent in a pro forma containing column (*i*) specifying the name and address of the person or organisation and column (*ii*) specifying the rule or sub-rule which is proposed to be modified and column (*iii*) specifying the revised rule or sub-rule proposed to be substituted and reasons thereof. The objections and suggestions, which may be received from any person or organisation with respect to the said draft before the expiry of the above mentioned period, will be considered by the State Government.

CHAPTER I
PRELIMINARY

1. *Short title and commencement.*— (1) These rules may be called the Maharashtra Employees' Compensation Rules, 2026.

(2) They shall come into force on the date of its publication in the *Official Gazette*.

2. *Definitions.*— (1) In these rules, unless the subject or context otherwise requires, -

